पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३७४/२०१८
दिनांक : २१/०६/२०१८

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दि.**२६/०६/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२६/०६/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०३**

दिनांक : २६/०६/२०१८ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२६/०६/२०१८** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २२/०५/२०१८ व १२/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक २६/०६/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरररसदस्य व नागरिंकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक २६/०६/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्यादृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै.मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक असल्याने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक २६/०६/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८ मी. रुंद रस्ता | सि.स.नं. ६५, ६६, ६७, ८८ व ६८९, तसेच गट नं. १२३ व गट नं. १६४३ | ४२००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३७४/२०१८
दिनांक : २१/०६/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.